अतितात्काळ

क्रमांक: एमआरडी-३३२०/प्र.क्र.२५/ नवि-७

**नगर विकास विभाग**
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८ एप्रिल,२०२०

प्रति,

१) महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई.

२) व्यवस्थापकीय संचालक,
मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

विषय:- कोविड-१९ महामारीचा प्रसार रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे थांबविण्यात आलेल्या बांधकाम प्रकल्पांची कामे सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ: १) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.प्र/आस्था-५१(कोविड-१९-००१/२०२०), दिनांक १३/४/२०२०,
२) व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे पत्र क्र.डीओ/एमएमआरसी/एमडी/कोविड-१९, दिनांक १३/४/२०२०,
३) केंद्रीय गृह मंत्रालयाचे आदेश क्र.४०-३/२०२०-DM-I(A) दिनांक १५/०४/२०२०,
४) मा.मुख्य सचिव यांचे आदेश क्र.डीएमयू-२०२०/प्र.९२/आव्यप्र-१, दि.१७/४/२०२०

कोविड-१९ महामारीचा प्रसार रोखण्यासाठी केंद्र शासनाने लागू केलेला लॉकडाउन केंद्रिय गृह मंत्रालयाच्या दिनांक १४/०४/२०२० रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०३/०५/२०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. तसेच संदर्भ क्र.३ येथील दिनांक १५/४/२०२० च्या आदेशान्वये दिनांक २०/०४/२०२० पासून काही निवडक अतिरिक्त बाबींना परवानगी देण्याबाबत केंद्रीय गृह मंत्रालयाने आदेश व सुधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. त्यास अनुसरुन राज्य शासनाने संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक १७/४/२०२० च्या आदेशान्वये सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

आपल्या संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की, संदर्भ क्र.४ च्या आदेशासोबतच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र.१६ (iii) नुसार लॉकडाऊन लागू होताना महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रातील जे बांधकाम प्रकल्प सुरू होते व ज्या प्रकल्पांमध्ये कामाच्या ठिकाणी कामगार उपलब्ध असून (इन सीटू कन्स्ट्रक्शन) बाहेरून कामगार आणण्याची आवश्यकता नाही, अशा प्रकल्पांचे काम सुरू ठेवण्यास दिनांक २०/०४/२०२० पासून परवानगी देण्यात आली आहे. मात्र, सदर सवलत / परवानगी ही कन्टेन्मेंट झोनमध्ये लागू असणार नाही. तसेच एखादे नवीन क्षेत्र कन्टेन्मेंट झोन म्हणून घोषित झाल्यास अशा क्षेत्रामध्ये तोपर्यंत देण्यात आलेल्या सदर सवलती रद्द होतील. तसेच सदर मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र. २१ (vii) मध्ये या सवलती प्राप्त करुन घेण्याच्या कार्यपध्दतीबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

लॉकडाऊनच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाने तसेच केंद्रीय गृह मंत्रालयाने व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे व सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

(आय. एस. चहल) 18/4-20

प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१

प्रत:-

१) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), मुंबई.

२) आयुक्त (सर्व महानगरपालिका)

३) महानगर आयुक्त, पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

४) आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., नागपूर.

६) व्यवस्थापकीय संचालक, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि., मुंबई.

७) संचालक, नगर रचना व मूल्यांकन संचालनालय, पुणे

यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत पत्रातील सूचनांच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी.

(आय. एस. चहल) 18/4-20

प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१